# नविन भुसंपादन कायदा-२०१३ च्या कलम १९(१) खालील अधिसुचना

## जिल्हाधिकारी,बीड यांचे कार्यालय,जि.बीड

(भुमिसंपादन,पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ नुसार जमीन संपादन पाझर तलाव क्र.१ मौजे टाकळसिंग ता.आष्टी साठी भुसंपादन.

क्रमांक-प्र.अ./भुस./कावि.०३/२०११. दिनांक :-१९/०४/२०१७.

ज्याअर्थी,समुचित शासन असलेल्या बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यास भुमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना,महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी,२०१५ अन्वये प्रारभिंक अधिसुचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसुचि एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची,अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशीलवार विनीर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी,बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याचे ,कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल,कोणताही असल्यास,विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत खात्री पटली आहे, आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषीत करण्यात येत आहे . आणि ज्याअर्थी अनुसुची तिन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषीत केले आत असुन,पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसुचि चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये,समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी पाटोदा यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक
## संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन
## गाव-मौ. टाकळसिंग तालुका- आष्टी जिल्हा -बीड

| अ.क्र | भुमांपन किंवा स.न /गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | ६४९ | ०.२१ |
| २ | ६५० | १.५० |
| ३ | ६५१ | १.०० |
| ४ | ६७४ | ०.३९ |
| ५ | ६७५ | ०.४२ |
| ६ | ६७६ | ०.१३ |
| ७ | ६७७ | ०.११ |
| ८ | ६७७ | ०.०१ |
| ९ | ६७७ | ०.०३ |
| १० | ६७८ | ०.३२ |
| ११ | ६७८ | ०.०४ |
| १२ | ६७८ | ०.१२ |
| १३ | ६७९ | ०.०४ |
| १४ | ६७९ | ०.०९ |
| १५ | ६७९ | ०.१७ |
| | **एकुण क्षेत्र** | ४.५८ |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :-** पाझर तलाव क्र.१ मौजे टाकळसिंग ता.आष्टी साठी भुसंपादन
**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :-** पाझर तलाव क्र.१ मौजे टाकळसिंग ता.आष्टी साठी सार्वजनिक कामाचे प्रयोजन
**समाजाला होणारे लाभ :- शेती पिकासाठी पाणी व जनावरांना पाणी व** इतर सार्वजनिक हितार्थ

## अनुसूची - तीन
## पुर्नवसाहत क्षेत्राचे वर्णन

| अ.क्र | भुमांपन किंवा गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## अनुसूची - चार
## (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक

संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र,३/अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम - १० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

**टिप :-** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी पाटोदा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांक :-१९/०४/२०१७.**
**ठिकाण :- बीड**

**स्वाक्षरीत/-**
**(नवलकिशोर राम)**
**जिल्हाधिकारी बीड तथा समुचित शासन**